केंद्र पुरस्कृत आयसीटी योजनेसाठी नियुक्त केलेल्या Third Party Audit संस्थेस निधी वितरीत करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयसीटी - २०१४/प्र.क्र.२५ भाग-१/एस.डी.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: ०५ डिसेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१०/प्र.क्र.३३/संगणक, दि. १५/०४/२०१०
२) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१०/प्र.क्र.३३/संगणक, दि. ०८/०३/२०११
३) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. २५/०३/२०१३
४) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. ०७/११/२०१३
५) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. ११/११/२०१३
६) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. ०१/०३/२०१४
७) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०११/प्र.क्र.१२/संगणक, दि. १४/०८/२०१४
८) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. ०५/०२/२०१५
९) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. ११/०५/२०१५
१०) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. २५/०८/२०१५
११) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. १८/१२/२०१५
१२) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. २७/१०/२०१६
१३) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. ६/१२/२०१६
१४) शासन निर्णय क्रमांकः आयसीटी-२०१४/प्र.क्र.२५/एस.डी.१, दि. २३/०३/२०१७
१५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८/०४/२०१७
१६) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांचे पत्र क्रमांक-रामाशिअ/ICT@School/KIPL/२०१७-१८/(२८/०६)/१५०९, दिनांक २४/१०/२०१७

शासन निर्णय -

राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत आयसीटी योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये BOOT तत्वावर व्हेंडर्स नियुक्त करुन त्यांच्यामार्फत शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा चालविण्यात येतात. सदर संगणक प्रयोगशाळेमधून विदयार्थ्यांना संगणकाचे शिक्षण आणि

संगणकामार्फत नियमित शालेय शिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येते. सदर योजनेच्या अंमलबजावणीची तपासणी करण्यासंदर्भात Third Party Evaluation / Audit करण्यासाठी दि.०१/०३/२०१४ च्या तसेच दि.१४/०८/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मे. क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद (आताचे नाव मे. क्रिश इंट्राट्रेड प्रा.लि. औरंगाबाद) या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार या संस्थेने योजनेचा टप्पा- ३ अंतर्गत स्थापन केलेल्या ४५५८ संगणक प्रयोगशाळांपैकी ४५३४ संगणक प्रयोगशाळांची तपासणी केलेली आहे. सदर कामासाठीचा रु. २,१४,४५,८२०/- (रुपये दोन कोटी चौदा लाख पंचेचाळीस हजार आठशे वीस फक्त) एवढा निधी मे. क्रिश इंट्राट्रेड प्रा.लि. औरंगाबाद या संस्थेस अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षाकरिता "२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००) (०६) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान योजना कार्यान्वित करणे (केंद्र हिस्सा) (२२०२ ३७९१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षातंर्गत रु.१००००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. सदर खर्च या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील परिच्छेद अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील १, २, ३,५, ६ व ७ मधील बाबी या आदेशासाठी लागू नाहीत. परिशिष्टातील मुद्दा क्र. ४ नुसार केंद्र शासनाचा निधी प्राप्त झाला असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अनौपचारिक संदर्भ क्र.३९७/अर्थोपाय, दि.१३/०९/२०१७ अन्वये दिलेले आहेत.

४. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.१८/०४/२०१७ च्या परिपत्रकातील सूचना नुसार करण्यात यावा. यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व सह सचिव (प्रशासन) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२०५१२२६५५९७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod Abaji Patil

Digitally signed by Pramod Abaji Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4a3b99d57d257e955ed34ca51db1f3c521002555e05c455e86fa1c9c82a1d82b, cn=Pramod Abaji Patil
Date: 2017.12.05 17:21:31 +05'30'

(प्रमोद पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३) मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
६) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, चर्नीरोड, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र½, मुंबई, नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र½, मुंबई / नागपूर
९) संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-६३
१०) सर्व वरिष्ठ लेखापरीक्षक (शिक्षण विभाग)
११) अवर सचिव (रोख शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) वित्त विभाग (व्यय-५)/नियोजन विभाग
१३) अर्थसंकल्प कार्यासन / निवड नस्ती